तंत्रशिक्षण संचालनालयातील महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशासकीय सेवा.गट-अ मधील सहसंचालक,तंत्रशिक्षण पदावरील पदोन्नतीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
*शासन निर्णय क्र.एससीटी-२००८/(२६/०८ )/तांशि-४*
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०९/०७/२००८
संदर्भ:-संचालक,तंत्रशिक्षण यांचे क्र.४/आस्था/२००८/६६७,दि.२३/४/२००८ चे पत्र.

**शासन निर्णय:-** तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातील महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशासकीय सेवा गट-अ या संवर्गात रु.१२०००-४००-१६५०० या वेतनश्रेणीत सहसंचालक,तंत्रशिक्षण या पदावर तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील उपसंचालक,तंत्रशिक्षण या पदावरील खालील अधिका-यांना तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असून त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर स्तंभ-६ मध्ये दर्शविण्यात येत आहे:-

| अ.क्र | अधिका-याचे नांव व सध्याचे पदनाम | सध्या कार्यरत कार्यालयाचे नाव | प्रवर्ग | पदोन्नतीनंतरचे पदनाम | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | श्री.गु.भि.धनोकार,<br>(इ.मा.व.)<br>उपसंचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुख्य कार्यालय,मुंबई. | तंत्रशिक्षण संचालनालय,मुख्य कार्यालय,मुंबई | खुला | सहसंचालक, तंत्रशिक्षण | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई येथील संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई या रिक्त पदावर. |

३. मा.उच्च न्यायालय,मुंबई येथील याचिका क्र.८४५२/०४ च्या संदर्भात मा.उच्च न्यायालयाने दि.९/३/२००७ रोजी दिलेले आदेश व त्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभाग पत्र क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दि.१३/३/२००७ अन्वये दिलेल्या सूचना लक्षात घेता,मूळ याचिका क्र.८४५२/०४ च्या निर्णयाच्या अधीन राहून सदर पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे.

४. उपरोक्त अधिका-यांच्या तात्पुरत्या पदोन्नतीसाठी तयार करण्यात आलेल्या निवडसूचीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची संमती प्राप्त झाल्यानंतर सदर पदोन्नती नियमित करण्यात येईल.

५. पदोन्नतीसाठी निवड झालेल्या वरील अधिका-यांनी ३० दिवसाच्या आत नवीन पदावर रुजु व्हावे.या विहीत मुदतीत सदर अधिकारी पदोन्नतीवरील पदावर रुजु झाले नाहीत अथवा पदोन्नतीचे पद स्विकारण्यास नकार दर्शवतील.त्यांचे नांव पदोन्नतीसाठी पात्र असणा-या अधिका-यांच्या निवड यादीतून काढून टाकण्यात येईल.सदर पदावरील पदोन्नतीसाठी पात्र असणा-या अधिका-यांची निवड यादी त्यानंतर जेव्हा बनवण्यात येईल,त्यावेळी सदर अधिका-यांच्या प्रकरणाचा गुणवत्तेप्रमाणे पुन्हा विचार केला जाईल.उपरोक्त तात्पुरती पदोन्नती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता अथवा ११ महिन्याचा कालावधी यापैकी जे आगोदर घडेल तोपर्यंत चालू राहील,त्यानंतर सदर तात्पुरती पदोन्नती आपोआप संपुष्टात येईल.

८. प्रस्तुत शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभागाच्या पत्र क्र.इएसबी-११०८/प्र.क्र.८९/०८/१३,दि.१८/६/२००८ अन्वये मिळालेल्या मान्यतेअंती निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(वि.भा.सोनवणे)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रत:-संबंधीत अधिकारी.

प्रतिलिपी-

- संचालक,तंत्रशिक्षण,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
- सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,अमरावती,नागपूर,नाशिक,औरंगाबाद.
- सचिव,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई.
- महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,विभागीय कार्यालय,पुणे,औरंगाबाद,नागपूर.
- महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परीक्षा),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर.
- सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग(पत्राव्दारे).
- अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
- निवासी लेखा अधिकारी,मुंबई.
- सामान्य प्रशासन विभाग,(कार्यासन १२,१३ व १६-ब),मंत्रालय.
- निवड नस्ती(तांशि-४)